# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

**बैठक क्रमांक** : 181

**स्थळ** : **यश-ईन सभागृह,**
**विद्यापीठ मुख्यालय, नाशिक**

**वार व दिनांक** : शुक्रवार दि. 3 **डिसेंबर** 2021

**वेळ** : **दुपारी 4.00** वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## (महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.181 शुक्रवार दि. 3डिसेंबर2021 दुपारी 4 वाजता यश इंटरनॅशनल सभागृह विद्यापीठ मुख्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1.प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू | अध्यक्ष |
| 2. मा.प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली | सदस्य |
| 3.मा.डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे | सदस्य |
| 4. मा. आ.श्री. सुहास कांदे,नाशिक | सदस्य |
| 5. मा.आ.श्रीमती सरोज आहिरे,नाशिक | सदस्य |
| 6. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 7. डॉ.दिनेश भोंडे, कुलसचिव | सचिव |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | |
|---|---|
| 8.मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 9. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 10. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 11. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 12. मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 13.मा.संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 14 प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | सदस्य |
| 15. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली | सदस्य |
| 16. मा.डॉ. सुधीर तांबे, नाशिक | सदस्य |
| 17. मा.श्री. विलास शिंदे, नाशिक | सदस्य |
| 18. मा.श्री.उदित सेठ, मुंबई | सदस्य |
| 19.मा.डॉ.संजय चोरडिया,पुणे | सदस्य |

| क्र.(No.) | | तपशील (Details ) |
|---|---|---|
| 181.1.0 | 181.1.1 | स्वागत (Welcome)<br>बैठकीच्या सुरूवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. |
| 181.2.0 | 181.2.1 | दि. 30 ऑक्टोबर 2021 रोजी झालेल्या 179 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे (Online / Offline App) कार्यवृत्त वाचून कायम करणे<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** दि. 30 ऑक्टोबर 2021 रोजी झालेल्या 179 व्या व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा **(Online / Offline App)** कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. |

181.2.2 दि. 30 ऑक्टोबर 2021 रोजी झालेल्या 179 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील (Online / Offline App) **ठराव क्र.** 179.3.9 वाचून कायम करणे

करारावरील 17 कर्मचाऱ्यांबाबत नियुक्त केलेल्या श्री. एच.बी. पटेल समितीचा अहवाल सादर करण्याबाबत व निर्णयार्थ या विषयाच्या अनुषंगाने दि. 30 ऑक्टो. 2021 च्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. 179.3.9 नुसार कार्यवाहीचा अहवाल –

ठरावाच्या अनुषगाने खालीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.कुलसचिव यांनी बैठकीत वाचून दाखविला

| ठराव क्र. | तपशिल | कार्यवाही अहवाल |
|---|---|---|
| 179.3.9 | 1. विद्यापीठाला 2013 पासून सहायक पदांची आवश्यकता असल्यामुळे विद्यापीठाच्या कायद्यातील कलम 5 (xvi) अन्वये एस-8 या वेतनस्तरात सहायकाची 45 पदे निर्माण करण्यात येत आहेत. | व्यवस्थापन मंडळ ठरावानुसार 45 पदे निर्माण करण्याबाबतची अधिसूचना काढण्यात आली. |
| | 2. करारावरील 17 कर्मचारी हे नियमित कर्मचाऱ्यासाठी असलेली निवडप्रक्रिया पूर्ण करून नियुक्त झालेले असल्याने पुन्हा निवडप्रक्रिया राबविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे या प्रकरणावर सहानूभुतीपूर्वक विचार करून त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्याच्या दृष्टीने, ठराव क्र. 179.3.9.1 नुसार निर्माण झालेल्या पदांवर त्यांच्या सेवा सहायक या पदावर नियमित करण्याचा ठराव करण्यात आला. हे कर्मचारी शैक्षणिकदृष्ट्या पात्र असल्यामुळे व करारावरील नियुक्तीच्या वेळी ते वयोमर्यादेची तसेच इतर अनुषंगिक पात्रतेची अट पूर्ण करीत होते. म्हणून या नियुक्त्या करतांना वयोमर्यादेची अट शिथिल करण्यात येत आहे. तसेच शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त सध्या लागू असलेल्या इतर अनुषंगिक बाबी पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात यावी. तथापि सदर नियुक्त्या करतांना पदोन्नती, सरळसेवा, आरक्षण कोटा, याचा विचार करण्यात यावा. पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांची पदोन्नतीच्या कोट्यातील पदांवर नियमानुसार पदोन्नती करण्यात यावी. | विद्यापीठातील पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांची पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांवर अंतिम सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती प्रक्रिया राबवून दि. 22.11.2021 रोजी पदोन्नतीचे आदेश देण्यात आले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करारावरील 17 कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेतांना या सेवा त्यांच्या रूजू होण्याच्या तारखेपासून नवीन नियुक्त्या राहतील. ते करारावरील सेवेच्या आधारे कोणतेही मागील वेतन व त्या अनुषंगाने कुठल्याही लाभास पात्र राहणार नाहीत. | दि. 23.11.2021 रोजी शैक्षणिक पात्रता तपासून 17 कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले. सदर नियुक्ती आदेशानुसार 17 कर्मचारी विद्यापीठ सेवेत रूजू झालेले आहेत.<br><br>ठरावानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 30 ऑक्टोबर 2021 रोजी झालेल्या 179 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकी**तील** (Online / Offline App) **वरील ठराव** क्र. 179.3.9 वाचून कायम **करण्यात आला व त्याची नोंद घेण्यात आली.** | |
| 181.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय ( Discussion Items)** | |
| | 181.3.1 | दि. 18 नोव्हेंबर 2021 रोजीच्या गट अ मधील उपकुलसचिव व सहायक कुलसचिव पदावरील पदोन्नती समितीची शिफारस मान्यतेसाठी सादर<br>**टिपणी** – विद्यापीठातील पदोन्नतीच्या कोट्यातील उपकुलसचिव व सहायक कुलसचिव पदाच्या रिक्त पदावर पदोन्नती करण्यासाठी खातेअंतर्गत पदोन्नती समितीचा मान्य अध्यादेश (Ordinance ) क्र. 18 (8 OF 1993) नुसार दि. 18 नोव्हेंबर 2021 रोजी विहीत समितीचे आयोजन करुन समितीने पात्र उमेदवारांची शिफारस केली आहे. सदरील शिफारस मान्यतेसाठी सादर<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** -<br>खाते अंतर्गत पदोन्नती समितीने डॉ.कैलास बोरसे, सहायक कुलसचिव यांना गट-अ मधील उपकुलसचिव पदावर, तसेच श्री.भुपेश गुल्हाणे,कक्षअधिकारी यांना सहायक कुलसचिव पदावर पदोन्नती देण्यास केलल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| | 181.3.2 | विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चितीतील भाविष्य निर्वाह निधीची 20% रक्कम अदा करणेबाबत<br>**टिपणी** - व्यवस्थापन मंडळ बैठक दि. ७.८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र, १७८.३.८ अन्वये सातव्या वेतन आयोगातील दि. १ .१.२०१६ पासूनची थकबाकी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना ८०% रक्कम रोखीन व २०% रक्कम भाविष्यनिर्वाह निधीत जमा करावी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व टेन्युअर पदावरील अधिका-यांना थकबाकी रोखीने अदा करण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार विद्यापीठातील संबंधितांना थकबाकीची ८०% रक्कम रोखीने अदा करण्यात आली असून २०% रक्कम रु. १,९७,०३,९९०/- भविष्यनिर्वाह निधीत जमा करण्यासाठी राखून ठेवलेली आहे. अद्याप सदरील रक्कम भविष्यनिर्वाह निधी खात्यात जमा केलेली नाही. दि. १ नोव्हेंबर २०२१ च्या "शासनशुध्दीपत्र क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.५/20/विशि -१ नुसार दि. २८.१२.२०२० च्या सातव्या वेतन आयोगातील शासननिर्णयात दुरुस्ती करून दि. १.१.२०१६ ते ३१.१०.२०२० या कालावधीत वेतनाचा लाभ देण्याबाबतचा निर्णय विद्यापीठाने घ्यावा असे कळविले आहे".<br>या अनुषंगाने दि.१.१.२०१६ ते दि.३१.१०.२०२० कालावधीतीतल भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यासाठी राखून ठेवलेली २०% रक्कमेबाबत निर्णय घेणे.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. १ नोव्हेंबर २०२१ च्या "शासनशुध्दीपत्र क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.५/20/विशि -१ नुसार दि. २८.१२.२०२० च्या सातव्या वेतन आयोगातील शासननिर्णयात दुरुस्ती करून दि. १.१.२०१६ ते ३१.१०.२०२० या कालावधीत वेतनाचा लाभ देण्याबाबतचा निर्णय विद्यापीठाने घ्यावा असे कळविले आहे". यास अनुसरुनविद्यापीठाने राखून ठेवलेली २० % भविष्य निर्वाह निधीची रक्कम रोखीने विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचा-यांना यांना अदा करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 181.3.3 | उस्मानाबाद येथे उपलब्ध होणा-या संभाव्य जागेत विद्यापीठाचे उपकेंद्र व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याबाबत नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन मंडळापुढे निर्णयार्थ सादर<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - उस्मानाबाद येथे उपलब्ध होणा-या संभाव्य जागेत विद्यापीठाचे उपकेंद्र व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याबाबत नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल मान्य करण्यात आला उपलब्ध होणा-या संभाव्य जागेत उपकेंद्र , स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र , अभ्यासिका इ. सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 181.3.4 | बारामती येथे विद्यापीठास प्राप्त झालेल्या भूखंडावरील इमारत बांधकामाबाबत निर्णय घेणे.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - बारामती येथे विद्यापीठास प्राप्त झालेल्या भूखंडावरील इमारत बांधकामाच्या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले, **सादर केलेल्या आराखड्यास** मान्यता देण्यात आली तसेच विद्यापीठाचे उपकेंद्रही स्थापन ठराव **क्र.** 178.3.1 दि.7.8.2021 नुसार मान्यता देण्यात आली. |
| 181.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय** |
| | 181.4.1 | विद्यापीठ प्रवेशद्वार ते गिरणारे- गंगापूर रोड या रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण व चौकाचे सुशोभीकरण करणे असा विषय मा.आ.सरोज आहिरे यांनी मांडला. |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठ प्रवेशद्वार ते गिरणारे- गंगापूर रोड या रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण, चौकाचे सुशोभीकरण करणे, याकामासाठी येणारा खर्च अंदाजे रुपये ४ कोटी किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सविस्तर अंदाजपत्रकाप्रमाणे (Detail Estimate) विद्यापीठ निधीतून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

सभेच्या शेवटी सर्व सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु तथा अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**